प्रेसनोट

दिनांक –१२/०६/२०२३

**लोकसेवक आरोपी लोकसेविका १) श्रीमती वर्षाराणी राजाराम खरमाटे, वय – ४० वर्षे, धंदा – नोकरी, सहायक वनसंरक्षक वाडा, ता. वाडा, जि.पालघर, आरोपी खाजगी इसम २) श्री. मुरलीधर शांताराम बोडके, वय– ५८ वर्षे, सेवानिवृत्त चालक, वनविभाग वाडा, ता. वाडा, जि. पालघर यांस लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पालघर यांनी घेतले ताब्यात**

| | | |
|---|---|---|
| १ | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/ घटक | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर |
| २ | पोलीस ठाणे गुन्हा नोंद क्रमांक | वाडा पोलीस ठाणे |
| ३ | कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध कायदा सन १९८८ (सुधारणा २०१८) चे कलम ७, ७ अ प्रमाणे |
| ४ | लोकसेवकाचे नाव व कार्यालय | आरोपी लोकसेविका १) श्रीमती वर्षाराणी राजाराम खरमाटे, वय – ४० वर्षे, धंदा – नोकरी, सहायक वनसंरक्षक वाडा,(वर्ग–१) आरोपी खाजगी इसम २) श्री. मुरलीधर शांताराम बोडके, वय– ५८ वर्षे, सेवानिवृत्त चालक, वनविभाग वाडा, ता. वाडा, जि. पालघर |
| ५ | मागितलेल्या लाचेची रक्कम | ६००००/– रूपये |
| ६ | स्विकारलेली लाचेची रक्कम | – |
| ७ | थोडक्यात हकिगत | यातील तक्रारदार यांचेकडे वृक्षतोड परवाना मागणी पत्रावरून मालकी हक्क/निर्गत दाखला मंजुर करुन देण्याचा मोबदला म्हणुन यातील आलोसे क्र. १ व २ यांनी तक्रारदार यांचेकडून ६०,०००/– रू लाचेची मागणी केली होती. परंतु तक्रारदार यांना आलोसे क्र.१ व २ यांना ६०,०००/– रू लाचेची रक्कम देण्याची ईच्छा नसल्याने त्यांचेविरूध्द कायदेशिर कारवाई होणेकामी दिनांक १२/०६/२०२३ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर कार्यालयात लेखी तक्रार दिली आहे.<br><br>तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने दि.१२/०६/२०२१ रोजी तक्रारदार यांना आरोपी लोकसेवक यांचे कार्यालयात पंचासह पाठवून पडताळणी केली असता, यातील तक्रारदार यांचे वृक्षतोड परवाना मागणी पत्रावरून मालकी हक्क/निर्गत दाखला मंजुर करुन देण्याचा मोबदला म्हणुन यातील आलोसे क्र. १ व २ यांनी तक्रारदार यांचेकडून ६०,०००/– रू लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले वरून आलोसे क्र. १ व २ यांचेवर कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर यांचेशी संपर्क करावा.

---

संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर प. ४०१ ४०४.
संकेतस्थळ :– acbmaharashtra@mahapolice.gov.in
ई–मेल – dypacbpalghar@gmail.com
ऑनलाईन तक्रार :– ---
ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net
टोल फ्री नं. :– 1064
दुरध्वनी क्रमांक :– 02525-297297
व्हॉट्स ॲप क्र. – 9923346810

(नवनाथ जगताप )
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,पालघर